# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/12/2021 (शनिवार)

---

## घरफोडी

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील लोकमत कॉलनी बुटीबोरी येथे दिनांक 17/12/21 चे 09.00 वा. ते 13.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– ग.भा सुगंधा दयाराम शेलोकर, वय 57 वर्ष, रा. लोकमत कॉलनी बुटीबोरी ता. जि. नागपुर यांनी आपले घराचे दाराला कुलुप लावुन नागपुर येथे कपडे खरेदी करायला गेल्या होत्या. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने खिडकीचा काच फोडुन लोखंडी सलाख तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने लोखंडी कपाटातील सोन्या–चांदीचे दागिने कि. 33,000/–रू. व चील्लर खुर्दा पैसे नगदी 2,00/–रू. असा एकुण कि. 33,200/–रू. मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी आशिष मोरखेडे मो.नं. 8208751249 हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत मौजा पाटणसांवगी येथे दिनांक 17/12/2021 चे 12.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ राजश्री अशोक डोईफोडे, वय 55 वर्ष, वार्ड क्र. 5 पाटणासांवगी सावनेर व आरोपी 1) सौ शुभांगी अक्षय डोईफोडे, रा. ह.मु. हेमंत मासुरकर याचे घरी महादुला कामठी नागपुर व 2) सौ. साधना हेमंत मासुरकर, रा. महादुला कोराडी कामठी नागपुर हे सख्खे नातेवाईक फिर्यादी ही आपले घरी हजर असतांना यातील दोन्ही आरोपी संगणमत करून फिर्यादीचे घरा समोर येवुन 'माझी मुलगी कुठे आहे', असे म्हणुन भांडण केले. यानंतर आरोपीतांनी हातबुक्कीने फिर्यादीला मारपीट केली व खाली पडलेली विट उचलुन फिर्यादीचे डोक्यावर फेकुण मारून जखमी केले व उजव्या हाताचे अंगठयाला चावा घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 336,324,323,504,34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री साखरकर तपास पोलिस हवालदार संदिप नागरे हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावरील काटोल ते जलालखेडा रोड, खापरी केने फाटयाजवळ येथे दिनांक 17/12/21 चे 18.00 वा. ते 18.30 वा. दरम्यान शेषराव लक्ष्मण टेंभेकर (मृतक) वय 53 वर्ष रा. दातेवाडी ता नरखेड हा त्याची एमएच– 40/व्ही– 8107 क्रमांकाच्या स्पलेन्डर मोटरसायकल ने दातेवाडीला जात असतांना काटोल ते जलालखेडा रोड, खापरी केने फाटयाजवळ एमएच– 32/पी– 2381 क्रमांकाच्या महेन्द्र ट्रॅक्टरचा चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व रसत्याचे परिस्थितीकडे दुलर्क्ष करून वळविल्याने मोटरसायकला धडक दिली. या अपघातात शेषराव टेंभेकर हे गंभीर जखमी होवुन मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विपिन पुरूषोत्तम टेंम्बेकर, वय 29 वर्ष, रा. दातेवाडी ता. नरखेड ह मु काटोल ता काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 336, 337, 338, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री प्रशांत लभाने मो.नं. 9823433863 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 11 कि. मी. अंतरावरील तान्हा मांगली बस स्टॉप जवळ येथे दिनांक 06/12/2021 चे 19:00 वा. दरम्यान दिनेश शंकरराव तुरणकर (मृतक) वय 33 वर्ष रा. वग ता. कुही जि नागपूर हे आपले एमएच–31/एफएल– 0941 क्रमांकाच्या मोटरसायकलने जात असता अज्ञात वाहना सोबत अपघात झाल्याने मृतकाला मुका मार लागला. त्यांना उपचाराकरिता प्रथम पीएचसी भुगाव व नंतर मेडीकल कालेज नागपूर येथे दि. 06/11/2021 भरती केले असता उपचारा दरम्यान दि 14/12/2021 चे 10.00 वा. त्यांचा मृत्यु झाला. सदर कागदपत्र मेडीकल कालेज नागपूर येथुन टपाल व्दारे पोस्टेला प्राप्त झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी तर्फे पोलिस नाईक कोमल कडू पोस्टे मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकल 134, 184/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सोनेकर मो.क्र 8975921770 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत मौजा कळमना ता. उमरेड येथे सुनिल नवनाथ मेश्राम (मृतक), वय 46 वर्ष, रा.कळमना ता. उमरेड यांना डेंगुचा आजार झाला होता. त्यांना पिलीया सुदधा झाला होता व दि. 15/12/21 रोजी सकाळी 06.00 वा. सुमारास त्यांची अचानकपणे प्रकृती खराब झाली. त्यांना उपचाराकामी प्रथम पिएच सी उमरेड व नंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे दि. 15/12/21 चे 11.19 वा. भरती केले असता उपचारा दरम्यान दि. 15/12/21 चे 12.30 वा. मरण पावले. मृतकच्या पत्नीच्या बयानावरून व कागदपत्रावरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जोशना सुनिल मेश्राम वय 35 वर्ष, रा. कळमना ता. उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक मनोज वाघ हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. रामटेक :– दिनांक 10/12/2021 चे 21:30 वा. ते 22.00 वा. चे सुमारास फिर्यादी/पीडित वय 40 वर्ष हि तिचे भावाचे घरुन आपले घरी जात असतांना आरोपी क्र.1) राहुल उर्फ मटटीतेल नंदलाल धारे, वय 19 वर्ष, 2) विशाल उर्फ टप्पू बबलु कठौते, वय 21 वर्ष व 3) राकेश उर्फ हग्गू मोहन यादव वय 28 वर्ष (गवळी) तिन्ही रा. कांद्री माईन ता. रामटेक यांनी संगनमत करुन फिर्यादीस आरोपी क्र 1 चे घरात नेवून तिचे हात व तोंड आरोपी क्र. 2 व 3 यांनी बांधुन, आरोपी क्र 1 ने तिच्यासोबत जबरी संभोग केला. आरोपी क्र. 2 व 3 यांनी आपल्या मोबाईल मध्ये सदर घटनेचे (जबरी संभोग) व्हिडीओ काढून गावातील व्हॉटसअप गृपवर व्हायरल केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 376 ड, 109 भादंवि. सहकलम 3(1),(डब्लु),अ अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. 1989. सहकलम 67(अ) माहिती तंत्रज्ञान अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी रामटेक विभाग श्री राजेन्द्र चव्हाण हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर